माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
### माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३३२/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. रामसेवक शोभनाथ मौर्या**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार-१ (विशेष कक्ष)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई -५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई -५१

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०६.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.११.२०१९ रोजी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित केले होते. तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १७.०२.२०२० आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. आयोगाने सदर व्दितीय अपील दि. २७.०८.२०२१ रोजी कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरीत केले. आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि.०१.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसिलदार- १ (विशेष कक्ष), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसिलदार- १ (विशेष कक्ष), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगास दि. २४.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

२. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तथापि, तक्रारकर्ता यांनी दि. २५.०६.२०२६ रोजी आयोगास ईमेल पाठवून सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली. तक्रारकर्ता यांची विनंती अमान्य करण्यात आली.

३. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास यापूर्वी दाखल केलेला दि. २४.०६.२०२२ रोजीचे अहवाल निदर्शनास आणून नमुद केले की, राज्य माहिती आयोगाचे दि. २७.०८.२०२१ रोजीच्या निर्णयानंतर तक्रारकर्ता यांना पुनश्चः दि. १६.०२.२०२२ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठविले. सदर पत्रान्वये "नस्ती निरिक्षण करावे जेणे करुन आपणांस आवश्यक असलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रती पुरविण्यात येतील" असे कळविण्यात आले. त्याप्रमाणे दि. १४.०३.२०२२ रोजी तक्रारकर्ता

..२/-

यांनी प्राधिकरणात उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची मागणी केली (म्हणजे त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे झेरॉक्स करीता पाने Fold केली.) त्यानुसार Fold केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढून तयार ठेवण्यात आल्या. त्यानंतर तक्रारकर्ता यांना प्राधिकरणातून दुरध्वनी वरुन संपर्क साधून कागदपत्रे/माहिती प्राप्त करुन घेणेबाबत सांगण्यात आले. त्यावर तक्रारकर्ता यांनी "माझे Shedule चेक करुन सांगतो" असे सांगीतले. दुरध्वनीवरुन संदेश देऊनही प्राधिकरणात उपस्थित न राहिल्याने तक्रारकर्ता यांना दि. ११.०४.२०२२ रोजी पुनश्चः पत्र पाठवून प्राधिकरणात उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविण्यात आले. परंतू अद्याप पर्यंत तक्रारकर्ता माहिती घेण्यासाठी प्राधिकरणात उपस्थित राहीलेले नाहीत.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे सादर केले की, नंतर तक्रारकर्ता दि. ०५.०३.२०२४ रोजी कार्यालयात उपस्थित राहिले व त्यांना हवी असलेली छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी सदर माहिती प्राप्त केल्याची नोंद आयोगास सादर केली.

५. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२६**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**